# शाश्वत विकासासाठी नदी वाचवणे आवश्यक

## दिग्दर्शक सावंत; भतगुणकी यांना वसुंधरा मित्र पुरस्काराचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. १७ : शाश्वत विकासासाठी नदी वाचलीच पाहिजे. नदी वाचविण्यासाठी मोर्चाची गरज नाही, धरणे आंदोलनाची गरज नाही आणि घोषणांचीही गरज नाही. नदी वाचवायची असेल तर नदीचा वापर योग्य पद्धतीने व्हायला हवा, अशी अपेक्षा नदी वाहते चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप सावंत यांनी व्यक्त केली.

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवात आज (गुरुवारी) सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी सोलापूरचे उपवन संरक्षक संजय माळी, सुभेदार बाबूराव पेठकर, महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव व वसुंधरा मित्र पुरस्काराचे मानकरी काशिनाथ भतगुणकी उपस्थित होते. सावंत यांच्या हस्ते भतगुणकी यांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले. नदी वाहते या चित्रपटाच्या माध्यमातून नदीचा वापर कशा पद्धतीने करता येईल, हे दाखविण्यात आले आहे. नदी वाचविण्याचा प्रवास हा खूप पूर्वीपासून सुरू झाला आहे. हा प्रवास कधीही न संपणारा असल्याचेही सावंत यांनी सांगितले.



**सोलापूर : किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवात गुरुवारी संदीप सावंत यांच्या हस्ते वसुंधरा मित्र पुरस्कार स्वीकारताना काशिनाथ भतगुणकी. या प्रसंगी वीरेंद्र चित्राव, उपवन संरक्षक संजय माळी, बाबूराव पेठकर.**

### हत्तरसंग कुडलला 'वॉक फॉर रिव्हर'

**हत्तरसंग कुडल येथे वॉक फॉर रिव्हर कार्यक्रम झाला. या वेळी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर, डॉ. मारुती मस्के, डॉ. रवी जाधव, डॉ. कुलकर्णी, नरेंद्र काटीकर, सीमंतिनी चाफळकर आदी उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांना नद्यांची उपयुक्तता, नद्यांच्या संगमाची माहिती देण्यात आली.**

श्री. माळी म्हणाले, झाडे लावण्यासाठी जो उत्साह दाखविला जातो, तसाच उत्साह झाडे जगविण्यासाठी दाखवायला हवा. शतकोटी वृक्षलागवड मोहिमेच्या माध्यमातून या कामासाठी लोकसहभाग मिळविला जात आहे. पूर्वी सोलापूर जिल्ह्यात माळढोकची संख्या १०० पर्यंत होती. आता, फक्त एकच माळढोक मादी शिल्लक आहे. विकास, औद्योगिकीकरण साधत असताना त्याचा परिणाम पर्यावरणावर होऊ नये, याची काळजी घ्यावी. या वेळी भतगुणकी यांनी मनोगत व्यक्त केले.